Pune Police

# प्रेस नोट दिनांक - १२/०७/२०१९

## बुधवार पेठ सारख्या भरवस्तीत ईलेक्ट्रिक सामानाचे गोडावून फोडुन सुमारे २५ लाखाची घरफोडी चोरी करून फरार झालेल्या आरोपींना मुद्येमालासह युनिट-१ ने केले जेरबंद.

---

यातील फिर्यादी नामे दिपक रमेश वाधवानी, रा-डी एस के फ्रांजीपानी को ऑप हौ सोसायटी, साधु वासवानी चौक, पुणे यांचे ईलेक्ट्रिक सामानाचे ५३१ बुधवार पेठ पुणे येथील गोडावून दिनांक ०६/०७/२०१९ रोजी रात्रौ ८/३० वा ते दिनांक ०८/०७/२०१९ रोजी ०३/३० वा चे दरम्यान बंद असताना कोणीतरी अज्ञात चोरटयांनी गोडावूनच्या दुस-या मजल्यावरील खिडकीची लाकडी फ्रेम तोडुन अनाधीकाराने प्रवेश करुन गोडावून मधील २४,६०,०००/- रु चे ईलेक्ट्रिक सामानाचे बॉक्स घरफोडी चोरुन नेलेबाबत फरासखाना पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नं-२४४/२०१९, भादविक - ४५४, ४५७, ३८० अन्वये गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयाचा युनिट-१,गुन्हे शाखेकडुन समांतर तपास सुरु करण्यात आला. घटनास्थळी श्री.अशोक मोराळे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.शिरीष सरदेशपांडे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्री.समिर शेख, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अरुण वायकर, पो.उप.निरी. दिनेश पाटील, पो उप निरी उत्तम बुदगुडे, पो उप निरी हनुमंत शिंदे यांनी स्टाफसह भेट दिली. घटनास्थळावरुन माहिती घेतली. स्थानीक चौकशी केली. युनिट-१ चे अधिकारी व कर्मचारी यांची तपास पथके तयार करुन यातील गुन्हेगारांचा शोध घेणेकामी सीसीटिव्ही फुटेज, गुन्हेगारांनी वापरलेल्या वाहनाची माहीती व तांत्रीक माहीतीच्या आधारे वरिष्ठांच्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे आरोपींचा शोध घेणेकामी रवाना केली.

सदरचा तपास करीत असताना पोलीस उपनिरीक्षक दिनेश पाटील व पो हवा योगेश जगताप, पो ना सुधाकर माने यांना आरोपींनी सदरचा गुन्हा करताना वापरलेला पॅगो टेम्पो मिळाला. त्याचे चालकाकडे तपास केला असता सदरचा टेम्पो हा त्याचे प्रतापगड, उत्तर प्रदेश येथील गावाकडील साथीदार यांनी मिळून सदरचा गुन्हा केला असल्याचे सांगितले. सदर टेम्पोचा मुळ नंबर एमएच-१२-क्युआर-७८२४ हा बदलुन सदर टेम्पोचा रंग बदलुन त्यावर चोरी करतेवेळी नंबरमध्ये खाडाखोड करून चोरी करून माल घेवून जावून पुन्हा टेम्पोचा आहे तो आरटीओ नंबर टाकला असल्याचे सांगितले.

सदरचा गुन्हा १) अक्षयकुमार श्रीमेवालाल सरोज वय २० वर्ष रा सध्या २२६ मंगळवार पेठ पुणे मुळगाव उत्तर प्रदेश २) विनयकुमार विरेंद्रनारायण सरोज वय २० वर्ष रा पाटील ईस्टेट झोपडपटटी शिवाजीनगर पुणे मुळगाव उत्तर प्रदेश ३) राहुल रामसजीवन सरोज वय १९ वर्ष रा सदर ४) निरजकुमार मेघाई सरोज वय १९ वर्ष रा २२६ मंगळवार पेठ पुणे मुळगाव उत्तर प्रदेश ५) सुनिलकुमार शामसुंदर सरोज वय २४ वर्ष रा सदर ६) अरविंदकुमार प्यारेलाल सरोज वय २० वर्ष रा सदर यांनी केला असल्याचे निष्पन्न झाले असून त्यांचेकडुन दाखल गुन्हयात चोरीस गेलेले ईलेक्ट्रिक सामानाचे बॉक्स कि रु २६,६०,८७८/- व गुन्हयात वापरलेला टेम्पो कि रु ३,००,०००/- तसेच आरोपींचे ०६ मोबाईल कि रु १,००,०००/- असा एकुण ३०,६०,८७८/- रु चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई ही श्री.अशोक मोराळे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.शिरीष सरदेशपांडे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्री.समिर शेख, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अरुण वायकर, पो.उप.निरी. दिनेश पाटील, पो उप निरी उत्तम बुदगुडे, पो उप निरी हनुमंत शिंदे, पोलीस कर्मचारी सुधाकर माने, रिजवान जिनेडी, श्रीकांत वाघवले तुषार खडके, इरफान मोमिन, प्रशांत गायकवाड, योगेश जगताप, तुषार माळवदकर, हनिफ शेख, बाबा चव्हाण, अनिल घाडगे, संजय बरकडे, वैभव स्वामी, अशोक माने, सुभाष पिंगळे, अमोल पवार, प्रकाश लोखंडे, सचिन जाधव, अजय थोरात यांनी केली आहे.

इम्रान शेख

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
युनिट १, गुन्हे शाखा, पुणे शहर

